# पोलीस आयुक्त, कार्यालय, ठाणे

कळवा खाडी पूलाजवळ, ठाणे (प.)–४००६०१
दूरध्वनी क्र. : २५३४४४९९
ई मेल cp.thane@mahapolice.gov.in

OW /DCP TRAFFIC THANE/CP-THANE/ NOTIFICTION/ 66 /2018 DATE- 10/09/2018

संदर्भ :–१) OW /DCP TRAFFIC THANE/CP-THANE/MUMBRA BYPASS REPAIR/2003/2018 DATE- 18/04/2018 AND DATE- 05/05/2018

विषय :– मुंब्रा–कौसा बाहयवळण रस्त्याचे प्रामा–४ किमी १३९/२०० ते १३९/८१० या लांबीतील रेल्वे उड्डाणपुलाचे मजबुतीकरण करणे व बेअरिंग बदलण्याचे कामानिमीत्त वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेत आल्याबाबतची जारी करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसचुना रद्द करण्यात येत असले बाबत.

–––०००–––

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

ज्याअर्थी, मुंब्रा– कौसा बाहयवळण रस्त्याचे प्रामा–४ किमी १३९/२०० ते १३९/८१० या लांबीतील रेल्वे उड्डाणपुलाचे मजबुतीकरण करणे व बेअरिंग बदलण्याचे कामानिमीत्त या मार्गावरून होणारी संपुर्ण वाहतूक बंद करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल कडून कळविण्यात आले होते.

२) ज्याअर्थी, मुंब्रा– कौसा बाहयवळण रस्त्यावरील पुलाचे दुरूस्तीचे काम पुर्ण होई पावेतो सदर मार्गावरून होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेत आल्याबाबत वरील संदर्भान्वये वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करण्यात आली होती. ( प्रत सलग्न )

२) ज्याअर्थी, मुंब्रा– कौसा बाहयवळण रस्त्यावरील पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांचे कडून पुर्ण करण्यात येवून दिनांक १०/०९/२०१८ रोजी या मार्गावरील वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

३) त्याअर्थी, मी विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त,ठाणे शहर, महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.–११६/सीआर /३७/टीआर,दि.२७.०९.१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापरकरून ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी पुढील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की :–

४) मोटार परिवहन कायदयाचे कलम २(१६) अन्वये परिभाषीत सर्व प्रकारच्या अवजड मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या (Heavy Goods Vehicles) वाहनांना ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून दररोज दुपारी १२.०० ते दुपारी ०४.०० तसेच रात्रौ २३.०० ते ०५.०० वा. दरम्यान वाहतूकीस मुभा देण्यात येत आहे. तसेच जे.एन.पी.टी.नवी मुंबई कडे जाणारी व येणारी वाहतूक ठाणे शहरातील मुंब्रा बायपास मार्गेच जातील व कल्याण शहरातून जे.एन.पी.टी.कडे जाणारी व येणारी वाहने फक्त रात्री २३.०० ते पहाटे ०५.०० या वेळेतच कल्याण फाटा मार्गे मार्गस्त होतील. इतर वेळी सर्व जड अवजड वाहनांना ठाणे आयुक्तालया अंतर्गत मार्गावर प्रवेशास बंदी राहिल.

५) तरी वरील संदर्भान्वये जारी करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना रद्द करण्यात येत असल्याची तसेच जड अवजड मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या (Heavy Goods Vehicles) वाहनांचे मार्गक्रमणास मुभा देण्यात आलेल्या वेळे बाबतची अधिसुचनेची राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

( विवेक फणसळकर )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर

प्रति,

संचालक, शासकिय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड ,मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येत आहे की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणा करीता जारी करण्यात आलेल्या वेळे बाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत :— जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/— संदर्भीय जारी करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना रद्द करण्यात आलेची तसेच मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणा करीता जारी करण्यात आलेल्या वेळे बाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत :—
जिल्हाधिकारी, ठाणे ,पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक, ( का.व सु.) मुबई
अपर पोलीस महासंचालक ,वाहतूक म.रा. मुंबई.
पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र नवी मुंबई.

प्रत :— आवश्यक कारवाईसाठी
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण, पालघर व रायगड
पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा, ठाणे
पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग, ठाणे व नवी मुंबई.

प्रत :— आयुक्त, ठाणे , भिवंडी निजामपुर शहर, कल्याण —डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगांव बदलापुर नगरपरिषद.

प्रत :— मुख्यव्यवस्थापक (वाहतूक) ,जे.एन.पी.टी.न्हावासेवा, नवी मुंबई.

प्रत :— स्विय सहाय्यक, मा.पालकमंत्री,जिल्हा—ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

प्रत:— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसचुना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सर्व संबंधीत वाहतूक संघटना.

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :— 10082018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,
ठाणे.

संदर्भ :— या कार्यालयाचे OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ 28 /2018
दि. १९/०६/२०१८

——०००——

मुंब्रा वाहतूक उपविभाग हद्दीतील मुंब्रा कौसा बाहयवळण मार्ग ब्रिजचे दुरूस्तीकरिता बंद असल्याने पनवेल, भिवंडी ,दिवा येथुन ठाण्याकडे जाणारी वाहने व ठाण्याकडुन पनवेल, डोंबिवली, दिव्याकडे जाणारी वाहने मुंब्रा शहरातुन ये जा करत असल्यामुळे व मुंब्रा शहरात एकच रस्ता असल्याने वाहतुकीची कोंडी मोठया प्रमाणावर होत असल्याने सदर मार्गावरील व परिसरातील वाहतूक सुनिश्चित होण्यासाठी मुंब्रा कौसा बाहयवळण मार्गावरील पुलाचे दुरूस्तीचे काम पुर्ण होई पावेतो वरील संदर्भान्वये खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसचुना जारी करण्यात आली होती.

**वाहनांचे वाहतूकीचे वेळे बाबत** :— मुंब्रा कौसा शहरातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सायंकाळी १७.०० ते २२.००वा. पर्यंत मुंब्रा शहरात प्रवेश करण्यासाठी मुंब्रा रेती बंदर व मुंब्रा वाय जंक्शन ( कालसेकर कॉलेज ) येथुन फक्त दुचाकी, तीनचाकी, कार यांनाच प्रवेश देण्यात येईल. तसेच रस्त्याचे कामाकरिता डंपर व माती घेवुन जाणारे अवजड वाहनांना रात्रौ १२.०० ते पहाटे ०५.०० वाजेपावेतो प्रवेश देण्यात येईल.

२) मुंब्रा— कौसा बाहयवळण रस्त्यावरील पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांचे कडून पुर्ण करण्यात येवून दिनांक १०/०९/२०१८ रोजी या मार्गावरील वाहतूक सुरू करण्यात आल्याने या मार्गाचे कामानिमीत्त वळविण्यात आलेली वाहतूक पुर्ववत सुरू करण्यात येत आहे.

३) तरी वरील संदर्भान्वये जारी करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसचुना रद्द करण्यात येत असून याबाबत प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग
ठाणे शहर

प्रत :— आवश्यक कारवाईसाठी
सपोआ ठाणे वा.विभाग/पोनि मुंब्रा वा.उपविभाग.

प्रत :— माहितीसाठी
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा.पोलीस आयुक्त,ठाणे व मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे व इतर सर्व संबंधीत.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.